**प्रेस नोट दि. १९/०६/२०२५**

**आरोपी लोकसेवक श्री.आलिम यासीन मुजावर, वय ३८ वर्षे, व्यवसाय नोकरी ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) ग्रामपंचायत आळते ता.तासगांव वर्ग-३ यांनी तक्रारदार यांचेकडुन ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन चर्चेअंती ४,०००/- रुपये लाच रक्कम मागणी करुन ४,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली असता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **सांगली** |
| **पोलीस स्टेशन** | तासगांव पोलीस ठाणे, जि.सांगली |
| **गुन्हा नोंद क्रमांक व कलम** | गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे. |
| **तक्रारदार** | पुरुष वय ३८ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय** | श्री.आलिम यासीन मुजावर, वय ३८ वर्षे, व्यवसाय नोकरी ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) ग्राम पंचायत आळते ता.तासगांव वर्ग-३ रा.पागा गल्ली, मस्जिद जवळ, रशीद शेख यांचे घरी भाड्याने तासगांव ता.तासगांव मुळ रा.जामा मस्जिद जवळ, मणेराजुरी, ता.तासगांव, जि.सांगली |
| **पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक** | ५,०००/- (चार हजार) रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ४,०००/- रु.लाच मागणी दि.१९/०६/२०२५ रोजी केली |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम** | ४,०००/- (चार हजार) रुपये |
| **सापळा कारवाई दिनांक व ठिकाण** | दि.१९/०६/२०२५ रोजी ग्रामपंचायत आळते ता.तासगांव येथे आलोसे यांचे कक्षामध्ये |
| **थोडक्यात हकीकत** | यातील तक्रारदार यांचे वडिलांचे नावे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना अंतर्गत मंजुर असले सिंचन विहीर खुदाई प्रकल्प प्रस्तावाचा प्रारंभीचा मागणी प्रस्ताव पाठविले बाबत तसेच सदर प्रस्तावाचे कार्यारंभ आदेश काढणे कामी, सदर प्रस्तावाची पुढील मस्टर मागण करणे कामी व प्रकल्प पुर्ण होई पर्यंत मदत करणेसाठी यातील आरोपी लोकसेवक श्री.आलीम यासीन मुजावर ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत आळते ता.तासगांव यांनी ५,०००/- रुपये लाचेची मागणी केले बाबतचा अर्ज तक्रारदार यांनी दिनांक १९/०६/२०२५ रोजी पथकास दिला होता.<br>तक्रारदार यांनी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १९/०६/२०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालय आळते या ठिकाणी आलोसे श्री.आलीम यासीन मुजावर ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत आळते यांचेकडे पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांचे वडिलांचे नावे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना अंतर्गत मंजुर असले सिंचन विहीर खुदाई प्रकल्प प्रस्तावाचा प्रारंभीचा मागणी प्रस्ताव पाठविले बाबत तसेच सदर प्रस्तावाचे कार्यारंभ आदेश काढणे कामी, सदर प्रस्तावाची पुढील मस्टर मागणी करणे कामी व प्रकल्प पुर्ण होई पर्यंत मदत करणेसाठी यापुर्वी तक्रारीत मागणी केले ५,०००/- रुपये लाचेपैकी तडजोडी अंती ४,०००/- लाचेची मागणी करुन लागलीच लाच रक्कम घेवुन येण्यास सांगितले होते.<br>त्यानंतर दिनांक १९/०६/२०२५ रोजी ग्रामपंचायत आळते येथे सापळा कारवाई वेळी यातील आलोसे यांनी त्यांचे कक्षामध्ये तक्रारदार यांचेकडून ४,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.<br>त्या अनुषंगाने आलोसे श्री.आलीम यासीन मुजावर ग्रामपंचायत, अधिकारी ग्रामपंचायत आळते वर्ग-३ यांचेविरूध्द तासगांव पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |
| **तपास अधिकारी** | श्री. किशोरकुमार खाडे, पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली |
| **मार्गदर्शन अधिकारी** | पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री.विजय चौधरी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे<br>पोलीस उपअधीक्षक श्री.अनिल कटके, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली |
| **सापळा पथक** | पोलीस निरीक्षक, श्री.किशोरकुमार खाडे, पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे तसेच पोलीस अंमलदार प्रीतम चौगुले, अजित पाटील, सलीम मकानदार, ऋषिकेश बडणीकर, पोपट पाटील, उमेश जाधव, रामहरी वाघमोडे, सीमा माने, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील, अतुल मोरे, चंद्रकांत जाधव, विणा जाधव, चालक विठ्ठलसिंग राजपुत |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप व मोबाईल नंबर **९८७०२२१३७९** तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

**संपर्क :-**

1) **मोबाईल ॲप -** www.acbmaharashtra.net
2) **फेसबुक पेज -** www.facebook.com-maharashtraACB
3) **वेबसाईट –** www.acbmaharashtra.gov.in

Khade.

**किशोरकुमार खाडे**
**पोलीस निरीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**सांगली.**